# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-१२० | दिनांक - २८/०३/२०२४

## कम्युनिटी पोलीसींग अंतर्गत जेष्ठ नागरीक यांना आरोग्य शिबीर व सहलीचे आयोजन

मा. पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, मा.पोलीस उपायुक्त सो, वसई परिमंडळ- ०२ व सहा. पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली,वरिष्ठ पोलीस निरीक्षक तुळींज पोलीस ठाणे श्री. शैलेंद्र नगरकर, श्री. सुधीर चव्हाण पोलीस निरीक्षक, श्री परमेश्वर राख पोलीस उपनिरीक्षक तुळींज पोलीस ठाणे जेष्ठ नागरीक सेल व गोपनीय अंमलदार यांचे वतीने आज दिनांक २७/०३/२०२४ रोजी तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील जेष्ठ नागरीक यांना कृपा फांऊडेशनच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

त्यांनतर तुळींज जेष्ठ नागरीक संघाचे ४० स्त्री व पुरुष जेष्ठ नागरीक यांना ठाकुर विदयालय नालासोपारा पुर्व यांचे खाजगी बस ने वसई किल्ला येथे मोफत एक दिवसीय सहल आयोजीत करण्यात आली. सदरवेळी वपोनि/श्री. शैलेंद्र नगरकर यांनी त्यांना आई वडील आणि जेष्ठ पालक/नागरीक देखभाल आणि कल्याण कायदा २००७ याबाबत माहिती दिली. तसेच त्यांना पोलीस हेल्पलाईन नंबर ११२ बाबत माहिती देण्यात आली. त्यांच्या अडीअडचणी समजुन घेवुन त्यांचे निरसण करण्यात आले. त्यानंतर एकत्रीत स्नेह भोजन व त्यानंतर करमणुक कार्यक्रम, गाण्यांचा कार्यक्रम करण्यात आला.

सदर कार्यक्रमास पोलीस कुंटुब कल्याणकारी सामाजीक संस्था (महाराष्ट्र राज्य) श्री पी एम दुपारे व त्यांचे सहकारी, कवी श्री. सुनील आसनकर, गायक श्री धनेश जाधव, श्री. अशोक पाईकराव,श्री संतोष मोहिते, तसेच जेष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष श्री दत्तात्रेय देशमुख यांचे सहकार्य लाभले.


कृपा फाउंडेशन
आयोजित
आरोग्य शिबीर
कृपा फाउंडेशन स्थलांतरीत कामगार


REDMI K50i | POLICE
27/03/2024 15:29


REDMI K50i | POLICE
27/03/2024 16:50